# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping distressed couple**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **13/12/2022**

**Brief of the work done :-**

सज्ञान असलेल्या प्रेमी - युगुलाचा घरच्यांच्या समुपदेशनातून_परवानगीने पो.स्टे. शिरपूर आवरात विवाह संपन्न.

## घरुन पळून गेलेल्या एका प्रेमी युगुलाचा विवाह



देशोन्नती वृत्तसंकलन...

### शिरपूर पोलिसांनी लावले तिसऱ्या प्रेमी युगलांचे लग्न

**शिरपूर** ■ शिरपूर गावातील एक प्रेमियुगल घरच्यांनी लग्नाला विरोध केल्याने घरून प्रेमाच्या आणाभाका घेत दोघे घरातून लग्न करण्यासाठी बाहेर पडले. प्रशाली परमेश्वर वानखेडे वय २१ वर्ष व अतिष सखाराम कांबळे वय २३ वर्ष दोघेही राहणार शिरपूर यांचे एकमेकांवर मागील २ वर्षांपासून प्रेम प्रकरण चालू होते.

घरच्यांना यांच्या प्रेम प्रकरणाची कुणकुण लागल्या नंतर घरच्यांनी लग्नाला विरोध दर्शविल्याने ८ डिसेंबर रोजी दोघांनी शिरपूर सोडले. व नागपूर येथील चैत्यभूमी परिसर गाठला. दोघाच्या घरच्यांनी हरवल्याची तक्रार पोलिसांना दिली पोलिसांनी तपास करून सदर जोडप्याला विश्वासात घेवून शिरपर येथे बोलावन घेतले. व दोघांच्याही आई वडीलांना बोलावून समुपदेशन केले.१२ डिसेंबर रोजी पोलीस स्टेशन आवारात एकमेकांच्या गळ्यात पुष्पहार घालून लग्न लावून दिले. पोलिसांनी कुटुंबिया कडून नववधूला त्रास देणार नाही ही हमी दिल्यानंतर नवं वर-वधू आनंदाने घरी गेले. यावेळी वधू वरांचे आई-वडील नातेवाईक, ठाणेदार सुनील वानखेडे, पो.हे.कॉ.संतोष पाईकराव, शंकर दाभाडे, गुप्तचर विभागाचे पंजाब घुगे, विजय मोरे तसेच दत्ता भांदुर्गे, मोहीब खान पठाण,वैभव सुरुशे, मंगेश सरकटे, दीपक बाभने आदी गावातील नागरिक उपस्थित होते.(वार्ता.)